# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

**मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राचा लोकार्पण सोहळा मा. खासदार, मा. आमदार व मा. आयुक्त यांच्या हस्ते संपन्न**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महाजनवाडी विष्णू मंदिर तलावालगत व घोडबंदर गाव येथील "नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर लोकार्पण सोहळा" मा. खासदार श्री. नरेश म्हस्के, मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक व मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते पार पडला. महाराष्ट्र शासनाच्या आपला दवाखानाच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महाजनवाडी व घोडबंदर गाव येथील नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिराचे लोकार्पण करण्यात आले. सदर प्रसंगी अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य) प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दिपक खांबित महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शहरी भागातील अतिशय दाटीवाटी असलेल्या भागांपासून तसेच झोपटपट्टी पासून नागरी आरोग्य केंद्राचे (UPHC) अंतर जास्त असल्यामुळे काही भागातील लोकसंख्या आरोग्य सेवांपासून वंचित राहू नये त्याकरीता सातत्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी, विविध रोगांच्या प्रादुर्भावाचे निरीक्षण व नियंत्रण करण्यासाठी तसेच सुलभ व परवडणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा प्रधान करण्यासाठी दर 15000 ते 20000 लोकसंख्येकरीता एका नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राची (Urban Health Wellness Center) स्थापना करण्यात येणार आहे. सदर आरोग्यवर्धिनी केंद्रात वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, बहुउद्देशीय कर्मचारी, सुरक्षा रक्षक, हाऊस किपिंग स्टाफ इतका मनुष्यबळ पुरवण्यात येणार आहे. त्याचबरोबर सदर केंद्रामध्ये बाह्य रुग्ण सेवा, मोफत औषधोपचार, मोफत प्रयोगशाळा तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी व लसीकरण या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नागरी आयुष्यमान आरोग्य केंद्र हे दुपारी 2.00 ते रात्री 10.00 वाजेपर्यंत नागरीकांच्या सेवेसाठी उपलब्ध राहणार आहे. तरी सदर नागरी आयुष्यमान आरोग्य केंद्रात शहरातील व जवळपासच्या परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.